# दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड
**वडमुखवाडी ता हवेली जि पुणे.**

**प्रेसनोट** **दिनांक-१०/०७/२०२३**

## पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे ग्रामिण परीसरात वारंवार चैन स्नॅचिंग करणाऱ्या टोळीला दिघी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाकडुन अटक करुन ०६ गुन्हे उघड करुन आरोपींवर “MCOCA” कायदयान्वये कारवाई केलेबाबत.....

---

दिघी पोलीस ठाणे येथे गु. रजि नं. १९५/२०२३ भा. द. वि कलम ३९२, ३४. या गुन्हयात फिर्यादी ता. ०२/०५/२०२३ रोजी रात्रौ ०९.१५ वा ते ०९.३० वा चे दरम्यान आझादनगर, धनलक्ष्मी हार्डवेअर दुकानाचे समोरील रॉयल चायनिज सेंटर दुकानासमोर, चऱ्होली बु//, ता. हवेली, जि. पुणे येथून पायी जात असताना फिर्यादी यांचे गळयातील चार तोळे वजनाचे मनी मंगळसुत्र त्यांचे पाठीमागून येणारी नारंगी रंगाची केटीएम मोटार सायकल यावरील पाठीमागे बसणारे इसमाने ओढून जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले म्हणुन वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच याचप्रकारचे गुन्हे दिघी पोलीस ठाणे हद्दीत घडले होते. सदर गुन्हयांचा तपास करणे बाबत मा. पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केले होते.

सदरचा तपास चालु असताना पाहिजे आरोपी आकाश वजीर राठोड, वय २३ वर्षे धंदा मजुरी ऐनळी वस्ती मुलखेड कचरा डेपो शेजारी गणेश तापकीर विट भट्टी ता मुळशी जी पुणे यास हवेली क्राईम ब्रांच अहमदाबाद गुजरात येथुन ताब्यात घेवुन ता. १२/०५/२३ रोजी अटक करुन त्याचेकडुन फिर्यादी यांचे चोरीस गेलेले मंगळसुत्रापैकी १,८१,०००/- रू. कि. चे ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व खेड पोलीस ठाणे गुरक्रं. ३८५/२३ भादवि कलम ३९२,३४. मधील फिर्यादी यांचे १,०३,०००/- रू. कि. २०.९४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र हस्तगत करण्यात आले होते. गुन्हयातील पाहिजे आरोपी बजरंग चतुर मारवाडी कुंभार, हा वारंवार त्याच्या जागा बदलत होता. पोउनि भदाणे यांनी तांत्रिक विश्लेशन करुन दि. २३/०६/२०२३ रोजी मा. पोलीस उपायुक्त सो, परीमंडळ ०१ यांचे मार्गदर्शनाखाली पाहीजे आरोपी मिळुन येण्याची शक्यता असलेली ठिकाणी पिंपरी चिंचवड, पुणे शहर व पुणे ग्रामिण मधील १० ठिकाणी १० पथके तयार करुन एकाचा वेळी छापा टाकुन पाहिजे आरोपी बजरंग कुंभार यास ताब्यात घेण्यात घेवुन आरोपीस दि. २३/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. आरोपीकडुन गुन्हयात वापरलेली १,५०,०००/- रुपये किमीतची गाडी क्रं एमएच १२ पी.पी. ८७२५ ही केटीएम गाडी जप्त करण्यात आली आहे. तसेच बजरंग कुंभार याने आकाश राठोड त्यांचे इतर दोन साथिदारांसोबत खालील गुन्हे केल्याची कबुली दिल्याने खालील गुन्हे उघड करण्यात आले आहे. तसेच पाहिजे आरोपींची नावे निष्पन्न करण्यात आली असुन त्यांचा शोध चालु आहे.

**<u>अटक आरोपी यांचेकडुन खालीलप्रमाणे एकुण ०६ गुन्हे उघड करण्यात आले आहे.</u>**

१) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं. १९५/२३ भादवि कलम ३९२,३४
२) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं. १५८/२३ भादवि कलम ३९२,३४
३) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं. २१४/२३ भादवि कलम ३९२,३४
४) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं. २१७/२३ भादवि कलम ३९२,३४
५) पिंपरी पोलीस ठाणे गुरक्रं. ४१९/२३ भादवि कलम ३९२,३४
६) खेड पोलीस ठाणे गुरक्रं. ३८५/२३ भादवि कलम ३९२,३४.

अटक आरोपी व पाहिजे आरोपी यांचेविरोधात पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे ग्रामिण हद्दीमध्ये एकुण ३० गुन्हे दाखल आहेत. आरोपी वारंवार वेगवेगळे साथिदार वापरुन संघटीतपणे टोळीने गुन्हे करत असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने अटक आरोपी व पाहिजे आरोपी यांचेविरोधात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**सदरच्या कारवाईत एकूण ४,३४,०००/- रू किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्हयातील ०४ आरोपींची नावे निष्पन्न करून खालील ०२ आरोपींना अटक करुन ०६ गुन्हे उघड करण्यात आले आहे.**

१) आकाश वजीर राठोड, वय २३ वर्षे धंदा मजुरी ऐनळी वस्ती गणेश तापकीर विट भट्टी मुलखेड, ता मुळशी जी पुणे.
२) बजरंग चतुर मारवाडी कुंभार, वय २९ वर्षे, धंदा मजुरी रा. उरवडे ता मुळशी जि पुणे व चौफला ता शिरुर जि पुणे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड श्री. विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त सो, डॉ. संजय शिंदे, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उपायुक्त सो, परीमंडळ ०१, श्री. विवेक पाटील मा. सहायक पोलीस आयुक्त सो, चाकण विभाग, श्री. राजेंद्रसिंह गौर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, दिघी पोलीस ठाणे श्री. मच्छिंद्र पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली दिघी पोलीस ठाण्याचे तपास पथकातील सुनिल भदाणे, पोलीस उप निरीक्षक, पोहा ७१३ चिंतामण फलके, पोहा ८०१ प्रदीप पोटे, पोहा ९५३ शरद विंचु, पोहा १०२० किशोर कांबळे, पोहा ११६८ सतीष जाधव, पोहा १४०६ शशिकांत पवार, पोना १५७१ बाळासाहेब विधाते, पोना १५७२ किरण जाधव, पोशि २०१२ रामदास दहिफळे, पोशि २०९४ बाबाजी जाधव, पोशि ३५५३ कसबे व पोशि ३३९१ भोसले यांनी तसेच मपोना १६२०/भागश्री जमदाडे पोलीस उपायुक्त कार्यालय परी.०१ यांनी केली.

(मच्छिंद्र पंडीत)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड